(तात्पुरती मंजुरी)

# अकोला महानगरपालिका, अकोला

## रेखांकन तात्पुरती मंजूरी आदेश

**(महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 45 अन्वये)**

प्र.क्र.अमनपा/अकृषी/01/15-16

जा.क्र.अमनपा/अकृषी/934/18

दिनांक - 04/08/2018

प्रति,

बि.जी.स्टील इन्फ्रा

तर्फे श्री मनोज मोहनलाल बिलाला

रा. अकोला

विषय - मौजे अक्कलकोट ता.जि.अकोला येथील स.न./गट क्रं. 2/1 क्षेत्र 11100.00 चौ.मी. जमीनीस वाणिज्य वापराकरिता तात्पुरती रेखांकन मंजुरी (प्राथमीक) मिळणेबाबत.

संदर्भ -
1. आपला प्र.क्र./अकृषी/अकोला/मनपा/01/16-17 दिनांक 26.06.2015 प्राप्त अर्ज.
2. तहसिलदार अकोला यांचे पत्र क्रं. प्रस्तु-1/कावि-1162/2018 दि.29.06.2018
3. सहाय्यक संचालक, नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय, अकोला यांचे पत्र क्रं. 679 दिनांक 19.06.2018

महोदय,

संदर्भीय अर्जान्वये प्राप्त झालेल्या नियोजित रेखांकन नकाशास सोबतच्या आराखड्याप्रमाणे खालील अटीवर तात्पुरत्या स्वरुपाची वाणिज्य वापराकरिता मंजुरी देण्यात येत आहे.

सदरचे रेखांकन आराखड्यास खालील अटींची पूर्तता करुन महानगरपालिकेकडून अंतिम मंजुरी घेणे आपणास बंधनकारक राहील.

<u>अटी</u> :-

1. मंजूर अभिन्यासाप्रमाणे उपअधिक्षक, भूमी अभिलेख, यांचे कडून प्रत्यक्ष जागेवर आखणी करावी. आखणी करीत असतांना सभोवतालच्या मंजूर अभिन्यासातील रस्त्याशी/नाल्याशी योग्यरित्या समन्वय साधणे आवश्यक राहील. आखणी नंतर काही फरक आढळल्यास जागेवरील आखणी केल्याप्रमाणे उपअधिक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी प्रमाणित केलेला आरेखीत मुळ मोजणी नकाशा व त्या आधारे तयार केलेले सिमांकित अभिन्यास नकाशे तयार करून या कार्यालयाकडे अंतिम मंजूरी मिळणे करिता सादर करावे लागतील.
2. अभिन्यासाची जागेवर प्रत्यक्ष आखणी करतांना/केल्यानंतर सार्वजनिक उपयोग करिता राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या 10% (1019.31 चौ.मी.) पेक्षा कमी नसावे. तसेच अभिन्यासातील जागेपैकी (509.65 चौ.मी.) सार्वजनिक सुविधा जागा (Amenity Space) पेक्षा कमी नसावी.
3. विषयांकित जागेत काही वृक्ष असल्यास आखणीचे वेळी ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावेत.
4. जर विषयांकित अभिन्यासातून महानगरपालिकेच्या पाण्याची पाईपलाईन जात असेल तर पाईपलाईनवर बांधकाम करता येणार नाही.
5. इजमेंट राईट बाबतची सर्व जबाबदारी अर्जदारावर रहील.

6. अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आहे, असे आढळल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.
7. सदरहु विषयांकित अभिन्यास सिमांकनानुसार महानगरपालिकेकडून अंतिम मंजूरी घेतल्यानंतरच सदरहु अभिन्यासातील भुखंडावर मनपा कडून विकासास मंजूरी देण्यात येईल.
8. प्रत्यक्ष मोजणीनंतर कोणत्याही भुखंडाचे क्षेत्र नकाशात दर्शविलेल्या भुखंडाच्या क्षेत्रापेक्षा कमी भरता कामा नये.
9. खुल्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करुन नये.
10. विषयांकित अभिन्यास नकाशातील रस्ते लगतच्या जमीनधारकांना जाण्यायेण्यास द्यावे.
11. विषयांकित अभिन्यास नकशातील कुठल्याही भुखंडाची उपविभागणी अथवा एकत्रिकरण महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय करु नये.
12. अंतिम मंजूरीपूर्वी नियमानुसार विकास शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील.
13. विषयांकित अभिन्यासातील जमिनीच्या मालकी हक्कात, क्षेत्रफळात, हद्दीत काही तफावत असल्यास अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारावर राहील.
14. अंतिम मंजूरीपूर्वी अभिन्यासातील रस्ते, साईट गटर, ड्रेनेज, पाण्याची लाईन, इलेक्ट्रीक पोल, खुली जागा फेंसिंग इत्यादी बाबींचा महानगरपालिकेचे मापदंडानुसार विकास करावा लागेल.
15. संदर्भ क्रं. 3 मधिल अट क्रं. 9 बंधनकारक राहील.
16. आपण सादर केलेल्या इतर विभागाचे ना हरकत प्रमाणपत्रामधिल सर्व अटी व शर्ती अभिन्यासधारकास बंधनकारक राहील.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

सोबत - (नकाशे 1 प्रतीत)

अकोला महानगरपालिका, अकोला. स्थापना 1-10-2001

आपला विश्वासू

नगर रचनाकार

अकोला महानगरपालिका, अकोला

प्रत -

1. मा.सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला यांना सहपत्रासह माहितीस्तव सादर
2. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांना आखणी करीत (Demarcation) कार्यवाहीस्तव सहपत्रासह अग्रेषित.